# दिनांक 13/04/2025

**1.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/04/2025 रोजी 03:30 वा च्या सुमारास मौजे ताम्हाणी घाटात सणसवाडी गावचे हददीत, माणगांव येथे आरोपीत रा. हिंजवडी पुणे याने त्याचे ताब्यातील इरटिका गाडी नं एम.एच. 14 ए.डब्ल्यु 3137 ही ताम्हाणी घाटमार्गे मुरुड येथे चालवित घेवुन जात असताना पहाटे 03.30 वाजण्याचे सुमारास सणसवाडी गावचे हददीत वळणावर आलेवेळी आरोपीत चालक याने रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अविचाराने व हयगयीने बेदरकारपणे वाहन चालवुन वळणावर गाडी कंट्रोल न करता आल्याने रोडच्या उजव्या बाजुला असलेल्या कातळाला जावुन ठोकर लागुन अपघात झाला आहे. सदर अपघातात जखमी 1) वैभव शिवश्याम खेणे, 2) आरबाज राजु मुलानी, 3) रोहीणी गावटे, 4) जायद वकील अन्सारी, 5) ज्ञान अशोक धोका, 6) महेंद्र जोशी सर्व रा पुणे यांचे किरकोळ व गंभीर दुखापतीस तसेच स्वतःचे ताब्यातील वाहनाचे नुकसानीस कारणीभुत झाला.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं. 79/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988 चे कलम 184, भारतीय न्याय संहिता कलम 281,125(a), 125 (b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा/प्रफ्फुल पवार हे करीत आहेत.

**2.** महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 12/04/2025 रोजी 02:00 वा च्या सुमारास मौजे देशमुख कांबळे येथील लक्ष्मी ऑर्गेनिक यूनिट 1 कंपनीच्या जय गणेश वर्कशॉप मधुन महाड एमआयडीसी,ता. महाड येथे आरोपीत क्र 1 व 2 यांनी त्यांचे आर्थिक फायदे करीता लबाडीच्या हेतुने एकूण 1,80,000/- रुपये व किमतीचा मुद्देमाल लक्ष्मी ऑर्गेनिक यूनिट 1 कंपनी प्रशासनाचे संमतीशिवाय चोरी करुन घेवुन जात असताना फिर्यादी व साक्षीदार, रा.कोल, ता.महाड यांनी सदर आरोपीत यांना अडविण्याचा प्रयत्न केला असताना आरोपीत क्र 2 याने फिर्यादी यास गंभीर दुखापत करणेचे उददेशाने लोखंडी रॉड मारुन दुखापत करुन तसेच आरोपीत क्र 1 याने जखमी साक्षीदार सिक्युरिटि गार्ड यांचा हात पिरगाळुन धक्का देवुन पळुन गेला. सदर गुन्ह्यातील आरोपी क्र 01 व 02 यांना दिनांक वेळ: 12/04/2025 रोजी 16:23 वा च्या सुमारास अटक करण्यात आली आहे.

याबाबत महाड (एम.आय.डी.सी.) पोलीस ठाणे गुरनं.42/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 331(7),3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/संजय मुंढे हे करीत आहेत.

**3.** माणगाव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 11/04/2025 रोजी 08:15 वा च्या सुमारास फिर्यादी

यांचा अल्पवयीन अपहरीत मुलगा हा घरात कोणाला काहीएक न सांगता घरातुन निघुन गेला असुन तो घरी परत न आल्याने त्याचा कोणीतरी अज्ञात इसमाने त्याचे अज्ञानपणाचा फायदा घेवुन फुस लावुन पळुन नेले.

याबाबत माणगाव पोलीस ठाणे गुरनं.80/2025, भारतीय न्याय संहिता कलम 137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री राठोड हे करीत आहेत.

**4.** वडखळ पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 10/04/2025 रोजी 16:00 वा च्या सुमारास फिर्यादी यांचे घरातुन पेण, येथे फिर्यादी यांचा मुलगा याच्या अज्ञानपणाचा कोणीतरी अज्ञात इसमाने फायदा घेवुन त्याला फुस लावुन पळुन नेले.

याबाबत वडखळ पोलीस ठाणे गुरनं.35/2025, BNS137(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई श्री चव्हाण हे करीत आहेत.

**5.** रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 24/03/2025 रोजी 17:15 वा च्या सुमारास मौजे वढाव बुद्रुक गावचे हददीत, अलिबाग, येथे फिर्यादि यांचे वडील हे रस्त्याचे डावे किनारपटटीवरुन खानाव बाजुने वढाव बुद्रुक गावचे नाक्याकडे पायी चालत येत असताना वढाव बुद्रुक बसस्टॉप पासुन 100 मी. अंतरावरील चिकण शॉप जवळ अलिबाग बाजुकडुन खानाव बाजुकडे जाणारी सफेद रंगाची एर्टीगा कार नंबर एम.एच.06सी.डी.8712 हि वरील आरोपित चालक रा. संजय गांधी हॉस्पीटल शेजारी साई श्रध्दा अपार्टमेंट ब्रामणआळी रोहा ता.रोहा यांनी सदर पादचारी यांचेकडे रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन अतिवेगाने व हयगयीने व बेदरकारपणे कार चालवुन रस्त्याने पायी जात असताना फिर्यादि यांचे वडीलांना ठोकर मारुन त्यामध्ये फिर्यादि यांचे वडिल श्री. गणेश शंकर पाटील यांचे डोक्याचे डाव्याबाजुस व डोळयास लहान मोठया दुखापतीस कारणीभुत होवुन त्यांच्या मृत्युस कारणीभुत झाला.

याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे गुरनं.40/2025, मोटार वाहन अधिनियम, 1988चे कलम 184, भारतीय न्याय सहीता 2023 106(1),281,125(a),125(b) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहा.फौज.दिनेश रामनाथ पिंपळे हे करीत आहेत.

6. नागोठणे पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 11/04/2025 रोजी 06:55 वा च्या सुमारास मौजे नागोठणे रेल्वे स्टेशन परिसरात, नागोठणे, रोहा येथे फियादी रा. देशपांडे प्लाजा गांधी चौक, रोहा यांची वाहनाचा मॉडेल सीबी शाईन एकूण 10,000/- रुपये व किमतीची मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीच्या इरादयाने फियादी यांच्या संमतीशिवाय स्वत:चे फायदयाकरीता चोरून नेली.

याबाबत नागोठणे पोलीस ठाणे गुरनं. 36/2025, भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 303(2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोह/महेश रुईकर हे करीत आहेत.

7. रसायनी पोलीस ठाणे हद्दीत दिनांक 08/04/2025 रोजी 01:30 वा च्या सुमारास मौजे वाशिवली वाडी ता.खालापुर येथे फिर्यादी यांची मुलगी हिचे अज्ञान पणाचा फायदा घेवून

कोणीतरी अज्ञात इसमाने फुस लावून पळवून नेली आहे.

याबाबत रसायनी पोलीस ठाणे गुरनं.79/2025, BNS 137 (2) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई/ माळी हे करीत आहेत.

## वाहतूक केसेस

दिनांक 12.04.2025 रोजी 28 पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणा-या एकूण 01 इसमावर कायदेशीर कारवाई करण्यात आली असून त्यांच्याकडून 1500/-रुपये इतका दंड आकारला आहे.